# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३९–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. दादासो उर्फ रामचंद्र शंकर शिंदे,<br>मु. पो. तिप्पेहळ्ळी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दादासो उर्फ रामचंद्र शंकर शिंदे, मु. पो. तिप्पेहळ्ळी, ता. जत, जि. सांगली यांनी आपणांस अनामत रक्कम भरुनही वीज जोडणी मिळाली नसल्यामुळे प्रथमत: अंतर्गत कक्ष, सांगली यांचेकडे ८.९.२००९ रोजी अर्ज दाखल केला आहे. कक्षाने १९.११.२००९ रोजी दिलेला निकाल मान्य नसल्याने १०.२.२०१० रोजी पोष्टाने पाठविलेला अर्ज मंचामध्ये १५.२.२०१० रोजी प्राप्त झाला. अर्ज प्राप्त झाल्यावर मुद्देनिहाय अभिप्राय ७.३.२०१० पर्यंत मिळावा असे वि.प.स कळविले. वि.प.ने १५.४.२०१० रोजी मुद्देनिहाय अभिप्रायाचे पत्र मंचास दाखल केले. दि. १९.४.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची तारीख नक्की करण्यात आली, त्यावेळी ग्राहक उपस्थित नव्हते, तथापि वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे

प्रस्तुत प्रकरणी श्री. दादासो उर्फ रामचंद्र शंकर शिंदे यांनी दि. ७.७.२००९ रोजी वि.प.ने कळविलेली अनामत रक्कम रु. ४०००/– रोखीने जमा केली आहे. सदरची रक्कम जमा करावयाचे चलन म्हणजेच फर्म कोटेशन देतांना त्यावर ०.०६ इतके लघुदाब वाहिनीचे काम करावयास पाहिजे अशी नोंद केलेली आहे. ग्राहकाने अंतर्गत कक्षात तक्रार दाखल केल्यावर व कक्षाचा निर्णय दि. १९.११.२००९ रोजी झाल्यावरही वि.प.ने वीज जोडणी देण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामध्ये ग्राहकाने दि. २१.१२.२००९ रोजी चाचणी अहवाल दिला असे नोंदवून दि. १२.४.२०१० रोजी वीज कनेक्शन देण्यात आले आहे असे नमूद केले आहे. याचाच अर्थ ३ महिन्यामध्ये वाहिनीचा विस्तार करुन वीज कनेक्शन देणे विनियमास अभिप्रेत आहे म्हणजे प्रस्तुत प्रकरणी २१.१२.२००९ रोजी सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर तीन महिन्याचा कालावधीची गणना केल्यावर दि. २०.३.२०१० पर्यंत कनेक्शन देणे विनियमास अभिप्रेत होते, कारण प्रत्यक्षात कनेक्शन १२.४.२०१० रोजी दिलेले आहे, म्हणजे २०.३.२०१० ते १२.४.२०१० इतका विलंब वीज जोडणी देण्यास झाल्याचे मंचाचे स्पष्ट मत आहे व त्यासाठी भरपाई देणे योग्य आहे असे मंचास वाटते. तथापि, दि. १२.४.२०१० अशी तारीख नोंद असलेला ग्राहकाच्या सहीचा अध्यक्षांचे नांवे लिहीलेला एक अर्ज मंचात दाखल झाला आहे. सदर अर्जामध्ये दि. १२.४.२०१० रोजी शेतीपंपासाठी वीज कनेक्शन मिळाले असल्यामुळे माझी मूळ तक्रार दूर झाली आहे, मला कंपनीकडून नुकसान भरपाई नको, दिलेला तक्रार अर्ज रद्द करण्यात यावा असा आशय मजकूर असलेला अर्ज मंचात दाखल झाला आहे. या अर्जाचा विचार करुन सदरचा नुकसान भरपाईचा तक्रार अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्जदाराच्या लेखी विनंतीनुसार अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :